एम.जे.सी. क्र.२/२०१९

संतोष पवार –वि.– वासुदेव पवार.

नि.क्र. ३० लगत

**गैरअर्जदारातर्फे सा.क्र. २ चा पुढील सरतपास गैरअर्जदाराचे विधीज्ञ श्री. डी. पी. पिसे यांचेमार्फत शपथेवर सुरु–**

३. मी माझे पुराव्याचे शपथपत्र अभिलेखावर दाखल केले आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर मी सही केली आहे. ते नि.क्र. ३० वर आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास अर्जदाराचे विधीज्ञ श्री. ए. आर. सरदार यांचेमार्फत सुरु–**

४. हे म्हणणे खरे आहे की, संतोष पवार व वासुदेव पवार माझ्याच गावचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, संतोष पवार नोकरीसाठी चंद्रपुरला राहतो व तो गावामध्ये येणे जाणे करतो. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, संतोष पवार हा वर्षातून एखाद्या वेळेस येतो. भगवान पवारच्या पहिल्या पत्नीचे नाव मला माहिती नाही. भगवान पवार यांच्या दुसऱ्या पत्नीचे नाव चंद्रभागाबाई आहे. चंद्रभागाबाई पासून संतोष व चित्रा हे दोन अपत्य झाले आहेत की काय हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, संतोष पवारच्या शेतीच्या धुऱ्याला लागून माझी शेती आहे. हे म्हणणे खरे नाही की, संतोष पवार याच्यासोबत माझा धुऱ्यावरुन वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यावर फौजदारी केस झाली होती. ज्या प्रकरणामध्ये मी आज साक्ष देत आहे ते प्रकरण संपत्तीबाबत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वासुदेव पवार यांच्या सांगण्यावरुन मी आज साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे प्रकरण कशाच्या बाबतीत आहे याबाबत वासुदेवने मला सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वासुदेव पवार सोबत माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वासुदेव पवार माझा शेजारी आहे. भगवान पवार यांच्या दोन पत्न्या होत्या व पहिल्या पत्नीपासून वासुदेव व इंदुबाई असे दोन अपत्य व दुसऱ्या पत्नीपासून संतोष व चित्रा असे दोन अपत्य होते की काय याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वासुदेव पवार यांच्या सांगण्यानुसार मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| **( एन. डी. मेश्राम )** | **( एन. डी. मेश्राम )** |
| दि.न्या.क.स्तर, शेगांव कोर्ट क्र.१ ले, | दि.न्या.क.स्तर,शेगांव कोर्ट क्र.१ ले, |
| दि. ०९.१२.२०२५ | दि. ०९.१२.२०२५ |